# व्यवस्थापनाऐवजी आपल्या देशात नद्यांची हत्याच झाली

## मॅगसेसे पुरस्कार विजेते प्रा. राजेंद्र सिंह यांचे प्रतिपादन



**औरंगाबाद / प्रतिनिधी**

आपल्या देशात नद्यांच्या व्यवस्थापनाऐवजी, हत्या करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. त्यामुळे जमिनीला ताप (वॉर्मिंग) आला आणि त्याचा परिणाम लोकांचे आरोग्य बिघडणे तसेच देशाच्या अर्थकारणावरही झाला. त्यामुळे देशातील नद्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन मॅगसेसे पारितोषिक विजेते, गंगा बचाव बोर्डचे चेअरमन प्रा. राजेंद्र सिंह यांनी केले.

येथील हॉटेल विटस्मध्ये इको नीडस् आयोजित इको रिव्होल्यूशन-२०११ (इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन सस्टेनेबल एन्व्हायर्नमेंट) या दोनदिवसीय परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ते म्हणाले की, पर्यावरण वाचवण्याबाबत खूप चर्चा झाली आहे. मात्र या दिशेने स्थानिक पातळीवर जेवढे कार्य व्हायला हवे तेवढे झाले नाही. मात्र जेथे अशा प्रकारचे कार्य झाले तेथील तापमानात घट झाली आणि शेती उत्पादनही वाढले. ग्लोबल वॉर्मिंगचा संबंध नद्यांशी आहे, नद्यांचे संरक्षण करून पर्यावरण वाचवून परिवर्तन घडवून आणण्याचे चांगले काम करणारे लोक एकत्र आले असल्याचे नमूद करून हे लोक मेहनत करणारे लोक असल्याचे त्यांनी सांगितले. या परिषदेच्या अनुषंगाने प्रा. राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वात एक जाहीरनामा मंजूर करण्यात येणार असून हा जाहीरनामा महाराष्ट्र शासनास पाठवण्यात येणार असून शासनाने २०११ मध्ये आपले नदीविषयक धोरण जाहीर करावे यासाठी सरकारवर दबाव टाकण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या शासनाकडे नदीविषयक धोरण नसल्याने नद्यांचे नाले होत आहेत. पत्रकार परिषदेस प्रा. प्रियानंद आगळे, थोरात, राहुल लांजेवार, डॉ. बबन इंगोले, दीपक आंधळे, प्रा. भाग्योदय घाटे, गवई उपस्थित होते.

### औरंगाबादच्या पाण्याची व्यवस्था शहरातच व्हावी!

औरंगाबाद शहराला लागणारे पाणी आपण ५० किलोमीटरवरून वीज खर्चून आणतो. याला काय अर्थ आहे, असे म्हणत ते म्हणाले की, या शहरासाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था याच ठिकाणी झाली पाहिजे. पुरातन काळात मलिकंबरने या शहरासाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था याच ठिकाणी केली होती तर मग तशी व्यवस्था आपण आज का करू शकत नाही, असा सवाल प्रा. राजेंद्र सिंह यांनी उपस्थित केला.

खाम नदीचा आज नाला झाला असल्याचे सांगून ते म्हणाले की, अशाप्रकारे देशातील सर्व नद्यांचे नाले झाले तर पिण्यासाठी पाणी कोठून येईल. आपल्या देशातील नद्यांचे नाले बनवून पिण्यासाठी बॉटलीबंद पाणी पुरवण्याचे परकीयांचे धोरण आहे. या व्यवसायात २८ लाख कोटींची गुंतवणूक परदेशी कंपन्या करीत आहेत.